LIVE MAHARASHTRA 24
महाराष्ट्राचे निर्भीड, निष्पक्ष आणि विश्वासार्ह डिजिटल वृत्तपत्र

गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६ • पान १/१

□ महाराष्ट्र • मुख्य मथळा

ब्रिटिशकालीन वसना नदीवरील महत्तवाचा पूल जमीनदोस्त! देखभालीअभावी ऐतिहासिक वास्तू हरपली; पंचक्रोशीतील गावांना आता मोठा वळसा!



सातारारोड : सातारारोड–पाडळी रेल्वे स्टेशन परिसरातील वसना नदीवरील ब्रिटिशकालीन पूल अखेर पाडण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून पंचक्रोशीतील गावांच्या दळणवळणाचा महत्त्वाचा दुवा ठरलेला हा पूल जमीनदोस्त झाल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. हा पूल केवळ ब्रिटिशकालीन वास्तू नव्हता, तर आजही अनेक गावांच्या दैनंदिन प्रवासासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग होता. त्यामुळे पूल पाडल्याने ऐतिहासिक वास्तू हरपण्याबरोबरच नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.स्थानिकांच्या माहितीनुसार, पुलाच्या देखभालीकडे आणि सुरक्षेकडे पुरेसे लक्ष दिले गेले नव्हते. पुलावर पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेली छिद्रे बुजली होती. त्यामुळे पाण्याचा योग्य निचरा होत नव्हता. पुलावर मोठ्या प्रमाणात माती व गाळ साचला होता. परिणामी, पुलाच्या कठड्यांची उंचीही मातीखाली गेली होती. सुमारे तीन फूट उंचीचा कठडा माती साचल्यामुळे

□ जलद वार्ता: मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक सह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ताज्या घडामोडी थेट LIVE महाराष्ट्र २४ वर